## विधि व न्याय विभाग

५ वा मजला, मुख्य इमारत, मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई ४०० ०३२, दिनांक १७ ऑक्टोबर २०२३.

**अधिसूचना**

**फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३.**

क्रमांक न्यास्थाप. ०५२२/४८८/प्र.क्र. ७१/कार्यासन-११.—फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ ( १९७४ चा २ ) हा महाराष्ट्र राज्यास लागू असताना, त्याच्या कलम ७ च्या पोट- कलम ( ३ ) तसेच कलम ९ यांद्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा, आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून ; आणि याबाबतीत यापूर्वी काढलेल्या सर्व अधिसूचनांचा भिवंडी या महसूली तालुक्याशी जेथवर संबंध असेल तेथेवर, त्यामध्ये अंशतः फेरबदल करुन, महाराष्ट्र शासन, मुंबई येथे अधिकारिता असणाऱ्या उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करुन, याद्वारे निदेश देत आहेत की, दिनांक २२ ऑक्टोबर २०२३ पासून, ठाणे जिल्ह्यातील भिवंडी, वाडा,जव्हार, विक्रमगड व मोखाडा या महसुली तालुक्यांसाठी सत्र उपविभागाची निर्मिती करीत आहे आणि उक्त सत्र उपविभागाच्या सीमांतर्गत उद्भवणाऱ्या प्रकरणांची न्यायचौकशी करण्यासाठी भिवंडी येथे सत्र न्यायालयाची स्थापना करीत आहे, ज्याचे पीठासीन अधिकारी अतिरिक्त सत्र न्यायाधीश असतील. प्रमुख सत्र न्यायाधीश, ठाणे हे, भिवंडी येथील सत्र उपविभागाचे देखील सत्र न्यायाधीश असतील, आणि त्यास, उक्त सत्र उपविभागाकडील प्रकरणे स्वतः निकाली काढण्याचे किंवा सक्षम अधिकारिता असलेल्या इतर कोणत्याही न्यायालयाकडे सोपविण्याचे, अथवा त्यास योग्य वाटतील अशी कोणतीही प्रकरणे, भिवंडी येथील अतिरिक्त सत्र न्यायाधीशाकडे सोपविण्याचे अधिकार असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**विलास व्ही. गायकवाड,**
विधि सल्लागार-नि- सहसचिव.